**सरकार वि. माधुरी गणेश चव्हाण**
नि.क्र.१९/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - सरिता प्रेम चव्हाण, |
| वय | - ५० वर्षे, |
| व्यवसाय | - टपरी, |
| राहणार | - केळकर कंपनीसमोर वाशीवली, ता. खालापूर, जि. रायगड. |

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) दिनांक २९/०३/२०२५ रोजी मी माझ्या टपरीत असतांना पोलिस माझ्या टपरीवर आले होते. तेथे पोलीसांनी माझी लिहीलेल्या कागदावर सही घेतली. त्यातील मजकूर मी वाचला नव्हता. माझ्या समक्ष कसलीही कार्यवाही झालेली नाही. आमच्या समक्ष काहीही जप्त करण्यात आले नाही. आता मला दाखविण्यात आलेल्या घटनास्थळ पंचनाम्यावरील अ.क्र.२ वरील डाव्या हाताच्या अंगठ्याची निशाणी माझी आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. अंगठ्याच्या निशाणीस **निशाणी क्र. २०** देण्यात आली आहे. पंचनाम्यातील अधोरेखांकित भाग 'अ' पोलिसांनी त्याप्रमाणे का लिहिला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही.

**( साक्षीदार त्याच्या पोलीसांसमोरील जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सरकारी वकील यांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. )**

२) हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९/०३/२०२५ रोजी मी व माझ्या सोबत दुसरा पंच अक्षय डोरे असे रसायणी पोलीसांसोबत पंचनाम्यासाठी केळकर कंपनीसमोर आई एकविरा खानावड वाशीवली येथे गेलेलो असतांना तेथे पोलीसांनी माझ्यासमक्ष आरोपी माधुरी गणेश चव्हाण हिच्या ताब्यातून देशी दारुच्या २४ बाटल्या जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा

केला व तो वाचून मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्याने त्याला वाचविण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. हर्षल पाटील यांनी नाकारला...**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.07.01 15:09:17 +0530

**( डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर

स्थळ - खालापूर.
दिनांक - ०१/०७/२०२६